# श्राद्धाचे महत्त्व आणि शास्त्रीय विवेचन

## मनोगत

‘श्राद्ध’ म्हटले की, हल्लीच्या विज्ञानयुगातील तरुण पिढीच्या मनात ‘अशास्त्रीय आणि अवास्तव कर्मकांडाचे अवडंबर’, अशी त्याविषयीची चुकीची प्रतिमा उभी रहाते. धर्मशिक्षणाचा अभाव, अध्यात्म समजून घेण्याविषयीची अनास्था, पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव, धर्मद्रोही संघटनांकडून हिंदु धर्मातील प्रथा-परंपरा यांवर सातत्याने होणारी द्वेषमूलक टीका इत्यादींचा हा परिणाम आहे. श्राद्धाविषयी पुढीलसारखी विचारसरणीही समाजात आढळून येते. पूजाअर्चा, श्राद्धपक्ष यांवर विश्वास न ठेवणारे किंवा समाजकार्यच सर्वश्रेष्ठ आहे, असे म्हणणारे, ‘पितरांसाठी श्राद्धविधी न करता त्याऐवजी गरिबांना अन्नदान करू किंवा शाळेला साहाय्य करू’, असे म्हणतात ! त्याप्रमाणे कित्येक जण करतातही ! असे करणे म्हणजे, ‘एखाद्या रोग्यावर शस्त्रक्रिया न करता त्याऐवजी आम्ही गरिबांना अन्नदान करू, शाळेला साहाय्य करू’, असे म्हणण्यासारखे आहे. श्राद्धातील मंत्रोच्चारांमध्ये पितरांना गती देण्याची सूक्ष्म शक्ती सामावलेली असल्याने श्राद्धविधीतून पितरांना गती मिळणे शक्य होते; म्हणून वरील विधाने हास्यास्पद ठरतात. वरील प्रकारची विचारसरणी असणाऱ्या व्यक्तींच्या डोळ्यांवरील अज्ञान आणि अंधविश्वास यांचे पटल दूर सारून त्यांना ‘श्राद्ध’ या हिंदु धर्मातील पवित्र संस्काराकडे पहाण्याची सकारात्मक अन् अध्यात्मशास्त्रीय दृष्टी लाभावी, या हेतूने मुख्यतः या ग्रंथाचे प्रयोजन केले आहे.

भारतीय संस्कृती असे सांगते की, ज्याप्रमाणे माता-पिता, तसेच निकटवर्तीय हयात असतांना त्यांची सेवाशुश्रूषा आपण धर्मपालन म्हणून करतो, त्याप्रमाणे त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्याप्रती आपले काहीतरी कर्तव्य असते. त्या कर्तव्यपूर्तीची आणि त्याद्वारे पितरऋण फेडण्याची सुसंधी श्राद्धकर्मामुळे मिळते. लहानपणी तळहातावरील फोडाप्रमाणे आपल्याला जपणाऱ्या आपल्या माता-पित्यांचा मृत्योत्तर प्रवास हा सुखमय आणि क्लेशरहित व्हावा, त्यांना सद्गती मिळावी यांसाठी श्राद्धविधी आवश्यक असतो. श्राद्ध न केल्यास पितरांच्या इच्छा अतृप्त राहिल्यामुळे, तसेच असे

वासनायुक्त पितर वाईट शक्तींच्या कह्यात जाऊन त्यांचे गुलाम झाल्याने वाईट शक्तींनी पितरांचा उपयोग करून कुटुंबियांना त्रास देण्याची शक्यता अधिक असते. श्राद्धविधीमुळे पितरांची या त्रासांतून मुक्तता होऊन आपले जीवनही सुसह्य होते. विशिष्ट वार, तिथी आणि नक्षत्र यांना श्राद्ध केल्याने पितृकर्म होण्यासमवेतच विशिष्ट फलप्राप्तीही होते. अशा विभिन्न पैलूंद्वारे श्राद्धाचे महत्त्व आणि लाभ या ग्रंथात स्पष्ट केले आहेत.

याचसमवेत नांदी, महालय, भरणी, त्रिपिंडी यांसारखे श्राद्धाचे प्रकार, श्राद्ध कोणी करावे, श्राद्ध कधी आणि कोठे करावे, श्राद्धासाठी योग्य ब्राह्मण न मिळाल्यास काय करावे, श्राद्धाच्या स्वयंपाकातील आवश्यक पदार्थ कोणते, श्राद्धकर्ता आणि श्राद्धभोक्ता यांसाठीचे विधीनिषेध कोणते यांसारखे उपयुक्त विवेचनही या ग्रंथात दिले आहे. श्राद्ध केल्याने पितरांना गती कशी मिळते, कावळा पिंडाला शिवण्यामागचे शास्त्र काय यांसारख्या सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या शंकांचे निरसनही या ग्रंथात केले आहे.

या ग्रंथाच्या अभ्यासाने आपल्या महान ऋषीमुनींनी दिलेला 'श्राद्ध'रूपी अनमोल संस्कृतीधनाचा वारसा जपण्याची सद्बुद्धी सर्वांना लाभो, तसेच श्राद्धविधी श्रद्धेने करता येऊन आपल्या पूर्वजांची, तसेच स्वतःचीही उन्नती साधता येवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## वाचकांना विनंती !

- 'संस्कृत' ही देवभाषा असून चैतन्यदायी आहे. तिच्यातील चैतन्याचा लाभ वाचकांना व्हावा, यासाठी सनातनच्या ग्रंथांत संस्कृत श्लोक / वचने छापण्यात येतात. यांमध्ये काही त्रुटी आढळल्यास वाचकांनी त्या आम्हाला अवश्य कळवाव्यात.
- ग्रंथांत संस्कृत वचने / श्लोक संदर्भासहित दिले आहेत. काही संस्कृत वचनांचे / श्लोकांचे संदर्भ मिळू शकले नाहीत, त्यांच्यापुढे कंसात 'संदर्भ - अज्ञात' असे लिहिले आहे. त्यांचा संदर्भ ज्ञात असल्यास कृपया वाचकांनी तो कळवावा.

# अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


**१. 'श्राद्ध' या शब्दाच्या संदर्भातील माहिती १७**

**२. 'श्राद्ध' म्हणजे 'पितरांचे कृतज्ञतेने स्मरण करणे', एवढेच नाही, तर तो एक विधी असणे १७**

**३. श्राद्धविधीचा इतिहास १७**

**४. श्राद्धाच्या तीन अवस्था आणि सांप्रत काळातील अवस्था १८**

**५. श्राद्ध करण्याचे उद्देश १८**

**६. श्राद्धाचे महत्त्व आणि आवश्यकता १९**

**७. श्राद्धामुळे होणारे लाभ २६**

**८. श्राद्धाचा परिणाम २९**

८ अ. श्राद्ध केल्यानंतर पितरांना सद्‌गती मिळण्याची प्रक्रिया २९

८ आ. श्राद्धाच्या विधींचा मृतात्म्याच्या सूक्ष्म-देहांवर होणारा परिणाम २९

८ इ. मृत्यूनंतर आत्म्याला प्राप्त होणारे सूक्ष्म-देह आणि श्राद्धविधींचे त्या देहांवर होणारे परिणाम ३०

**९. श्राद्धकर्त्याच्या सात गोत्रांतील गती मिळणारी एकशे एक कुळे ३१**

**१०. श्राद्धाच्या देवता ३२**

**११. श्राद्धाचे प्रकार आणि त्यांचे लाभ ( नित्य श्राद्ध, नैमित्तिक श्राद्ध, काम्य श्राद्ध, नांदीश्राद्ध, पार्वण श्राद्ध आणि इतर प्रकार ) ३२**

**१२. नारायणबली, नागबली आणि त्रिपिंडी श्राद्ध ५०**

**१३. श्राद्धाची परिभाषा ५७**

**१४. तर्पण आणि पितृतर्पण ५९**

**१५. श्राद्ध कोणी करावे ? ६३**

**१६. श्राद्ध कधी करावे ? ६६**

* सर्वसाधारणतः योग्य तिथी ६६
* मृत्यूतिथी ज्ञात नसल्यास श्राद्धविधी कधी करावा ? ६७
* दिवसातील योग्य काल ६८
* श्राद्धाच्या विशेष तिथींना पितृश्राद्ध केल्यास होणारे लाभ ६९
* श्राद्धाच्या प्रकारानुसार श्राद्धकाल ७४
* श्राद्धासाठी वर्ज्य काल ७७
* आपत्कालात श्राद्ध करण्यासंदर्भातील नियम ७८

**१७. श्राद्ध कोठे करावे ? ७९**

* श्राद्धासाठी योग्य जागा (श्राद्धदेश) ७९
* विशिष्ट क्षेत्री श्राद्ध करण्याचे महत्त्व ८०

**१८. श्राद्धाची तयारी ८२**

**卐 श्राद्धविधींविषयी टीकात्मक विचार आणि त्यांचे खंडण ९९**

**श्राद्धकर्माचे अध्यात्मशास्त्रीय महत्त्व सांगणारा सनातनचा ग्रंथ !**

**श्राद्धातील कृतींमागील शास्त्र**



卐 श्राद्धात जानवे उजव्या खांद्यावरून (अपसव्य) का घालतात ?

卐 श्राद्धात ब्राह्मणांना दिलेले अन्न पितरांपर्यंत कसे पोहोचते ?

卐 श्राद्धामुळे पितृऋणातून मुक्त कसे होता येते ?

卐 श्राद्धविधी शास्त्रानुसार न केल्याने काय हानी होते ?